VOL- X ISSUE- XII DECEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# अर्श विवेचन

**Dr. Baban Dagu Mohan**
M.S (Shalyatantra)
Professor (Shalyatantra department)
Anand ayurved college, Vaijapur

**प्रस्तावना** (Abstact) :

आठ महान आजारातील एक म्हणजे अर्श होय , अर्शाचे शुष्कार्श , रक्तार्श असे मुख्य प्रकार आहेत तरह प्रथमावस्था, द्वितीयावस्था, तृतीयवस्था अशा अवस्था आहेत, रक्त स्राव, वेदना,मलावष्टभ, मांसवृध्दी ही प्रमुख लक्षणे आहेत चिकित्सेत १) औषधि २) क्षार३) अग्निकर्म ४) शस्त्रकर्म प्रमुख पद्धति आहेत.

" **अरिवत् प्राणम जायती इति अर्श** "

शत्रुप्रमाणे प्राणाचा नाश करणारे ते अर्श होय. ... म्हणून सुश्रुताचार्यांनी अर्शाची गणना अष्टौमहागदामध्ये केलेली आहे. विविध प्रदेशातील बोली भाषांमध्ये या करीता अनेक शब्द वापरले जातात. जसे मूळव्याध, बवासीर, मस्से, हरस, कोंब इ. सध्याला जवळपास लोकसंख्येच्या ५०% लोकांना या व्याधीचे ग्रासलेले असून यापैकी ७५% टक्केहून अधिक लोकांना एका पेक्षा अनेक वेळा शस्त्रमार्गाची गरज पडत आहे.

शस्त्रकर्म करुनही रोगाचा पुनर्भव टाळता येत नाही. तसेच संपूर्ण चिकित्सा कालावधीत रुग्णाला शारिरीक व मानसिक वेदना अनुभवाव्या लागतात. म्हणूनच या व्याधीसाठी विविध चिकित्सा पध्दतीचा उपयोग केला जातो. परंतु यासर्वांपेक्षा सरस अशी आर्श आध्यायातील क्षारसुत्र संकल्पनेला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

**प्रकार** : अर्शाचे मुख्यत: २ प्रकार

1) **शुष्कार्श** : (बाह्य आर्श) गुदद्वाराच्या बाह्य बाजूस दिसणारी ही मांसवृध्दी असते. रक्तस्त्राव होत नाही. म्हणून शुष्कार्श म्हणतात.

2) **रक्तार्श** : (अभ्यंतर आर्श) गुदाच्या आतील भागात दिसणारी ही मांसवृध्दी असते. आतील रक्तस्त्रावामुळे यास रक्तार्श असे म्हणतात. यामध्ये अर्श आतील भागात असल्यामुळे वेदणारहीत असतात. त्यामुळे रुग्ण दुर्लक्षित करतो आणि त्यापुढे जावून पाण्डू (Anaemia) ची निर्मिती होते. त्यामुळे रुग्णाला थकवा, चाकर येणे, चिडचिड होणे दम लागणे, ई. त्रास दिसून येतात. रक्तार्शाच्या साधारणत: ३ अवस्था पडतात.

अ)**प्रथमावस्था** : या अवस्थेत फक्त रक्तस्त्राव शौचानंतर होतो पण विशेष काही त्रास नसतो.

ब ) **द्वितीयावस्था** : मध्ये अर्शाचा मांसलभाग गुदाच्या बाहेर येतो व नंतर आपोआप मध्ये जातो. सोबतच रक्तस्त्राव पण असतो. अल्पशा वेदना होतात.

क) **तृतीयावस्था** : अर्शाचा मांसलभाग कायम स्वरुपी बाहेरच राहतो. तीव्र वेदना होतात. क्षणास बसता येत नाही. सोबतच स्त्राव तयार होतो. हेतू आणि संप्राप्ती : विरुद्धाहार, विषमांशन आणि गुरु पदार्थाचे मलाचा वेगावरोध, पोहा शाबुदाना, फास्टफुड, चाट मसाला ई. उष्ण तिक्ष्ण, मसाल्याचे पदार्थ, विषम आहार व अल् निद्रा, व्यायामाचा अभाव इ. कारणाने थोडक्या अग्निमांध होवून पचन बिघडते व त्यामु मलावरोध कठिण मलठ प्रवृत्ती अथवा वारंवार होणारी मलप्रवृत्ती दिसुन येते. अशा मल प्रवृत्तीच्या वाढणाऱ्या दाबामुळे अभ्यंतर गुदातील रक्तवाहीण्या (Hemorrohoidal vein) चा विस्तार होवून त्या ठिकाणी अर्शरूपी मांसवृध्दी तयार होते.

**लक्षणे** :

१) **रक्तस्राव** : अर्शामधून येणारे रक्त हे ताजे व लाल असते त्याचे प्रमाण थेंबापासून ते मोठ्या फवाऱ्या सारखे होते.

२) **वेदना** : शौचाच्या ठिकाणी टोचल्याप्रमाणे, ठसठसणे, आग पडणे, कापल्यासारखे वेदना होतात.

३) **मलावरोध** : गुदमार्गात वाढलेल्या अर्शामुळे अडथळा निर्माण होवून व अग्निमांधामुळे मलाची बांधणी तयार न झाल्यामुळे शौचास जोर द्यावा लागतो व वारंवार जावे लागते.

४) **मांसवृध्दी** : प्रथम टप्प्यात अर्श छोटे असतात परंतु दुसऱ्या, तिसऱ्या, टप्यात उत्तरोत्तर मांसवृध्दी वाढत जाते.

५) **इतर लक्षणे** : दौर्बल्य, कटीशुल, पिण्डिकोद्वेष्टण, उरगौरव, अजिर्ण, अन्नाभिलाषा,पाण्डू इ.

**स्थान** : अभ्यंतर अर्श हे 30° Clock, 70°, 110° Clock, ते या स्थानी आढळतात. हे प्रायमरी पाईल्स असतात. परंतु सेकंडरी पाईल्स हे वरील स्थान सोडून दुसऱ्या ठिकाणी असतात ते छोटे छोटे असतात.

**उपद्रव** :

अत्याधिक रक्तस्राव, अनेमिया, थ्रांबोसीस 30° (Thrombosi) अर्शोभगंदर, मांस कोथ, (Fibro sis of pile Mass etc. व्याधीव्यवच्छेद (Diffe ential dignosis).

१) फीशर, भगदर, २) Ulcerative Colitis

3) Crohns disease 4) IBS

5) Rectal Ulcer/polys 6) *CA- Rectum

**चिकित्सा** : आयुर्वेदानुसार अर्शचिकित्सेचे चार प्रकार आहेत.

१) औषधी २) क्षार

३) अग्रीकर्म ४) शस्त्रकर्म

**१) औषधी** :

अग्निमांद्य व मलावष्टंभ हे व्याधीचे मुळ कारक असल्यामुळे मलाचे मृदुकरण व अग्रीवर्धन हो, चिकित्सेची पहिली पायरी ठरते. याकरीता गंधर्व हरीतकी, पंचसकार (चूर्ण) इसबगोल, बाहवा मगर, निशोत्तर, सेना अशा मृदुविरेचक द्रव्याचा वापर रुणाचे कोष्ट परिक्षण करुन करावे लागते. व अग्नी मांद्यासाठी दीपन पाचन अशी शुण्ठी, वित्रक, शिवाक्षार, औषधी उत्तम, ठरतात. यासर वेदनाशाम शोधहूर म्हणून त्रिफळा गुगुळ, अशोजी हो, कांकायण वटी, अर्शकुठाररस उत्तम आहे. व रक्तस्तंभासाठी नागकेशर, वासा, रक्तस्तंभक वटी, बोलबद्धरस, इ. औषधी वापरल्यास, उत्तम रक्तस्तंभन होते. तसेच चरकाचार्यांनी सांगितलेले तक्रारिष्ट हे सर्वश्रेष्ठ औषधी होय व सुश्रुताचार्यांनी वर्णिलेलेपथ्यापथ्य ही उपद्रव व व्याधी पुनभवं टाळण्यास मदत करतात.

आहारामध्ये पालेभाज्या, फळभाज्या, फळे फायब्रस आहार मल प्रवृत्ती प्राकृत करण्यास मदत होते. विहारामध्ये सतत बसणे अथवा उभे राहणे.

यामुळे गुदस्थानातील रक्तवाहीण्यावर ताण पडत असल्याने ते टाळावे. नियमित व्यायामानेही उपयोग होतो. एकूणच औषधी चिकित्साही प्रथम व द्वितीय अवस्थेत उपयुक्त ठरते.

**२) क्षारलेपन** :

प्रथम व द्वितीयावस्थेतील अर्शावरती पाणिय क्षारांचे लेपन केल्यास अर्शाचे क्षरण होते पण ही चिकीत्सा सध्याला वापरात नाही.

**३) अग्निकर्म** : Infarared चिकित्सासाठी अग्निकर्म आहे.

*_Sclerothearopy_* : सध्याला ही चिकित्सा पध्दती अधिक प्रचलित असून यामध्ये Waqulaut Injectiarial चा वापर केला जातो.

**४) क्षारलेपन** :

१) *क्षारसुत्र* : खूप मोठ्या आकारेच अर्श सोडल्यास इतर सर्व बाह्य व अभंतर अर्श क्षारसुत्राने बरे होतात.

2) Rubberband Ligation ही अभ्यंतर द्वितीय अवस्थेत पर्यंतच उपयुक्त.

3) Stepler Methoad ही पध्दती शखकर्माची नविन पध्दती आहे परंतु खूप खर्चिक अशी आहे.

**निष्कर्ष (Conclusion)** :-

अर्श संप्राप्ति ला प्रमुख कारण म्हणजे मलावष्टभ, मलावष्टभ झाल्यास त्याचा उपचार वेलेवर झाल्यास अर्श होणे सहज टालता यएऊ सकते.

**Refrences :**

१ )सुश्रुत संहिता चिकित्सा स्थान ६/३
२) चरक संहिता चिकित्सा स्थान १४ .
३) अष्टांग हृदय चिकित्सा स्थान ८/१६९ ,
४) वाग्भट चिकित्सा स्थान ७,
५) अष्टांग हृदय निदान ७/१,
६) काश्यप संहिता सु २५/२३.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com